Please Consider the Environment Before Printing…

**Date: 18/04/2025**


## Activity Name: Day Special

## दिन विशेष

### News Paper Name: आपलं महानगर

**Page No. 04**

# दिनविशेष



## थोर समाजसुधारक महर्षी धोंडो केशव कर्वे

महर्षी धोंडो केशव कर्वे हे आधुनिक भारतातील एक श्रेष्ठ व कर्ते समाजसुधारक होते. त्यांचा जन्म १८ एप्रिल १८५८ रोजी कोकणातील मुरुड येथे झाला. त्यांचे शालेय शिक्षण मुरुड व रत्नागिरी येथे झाले. १८९१ मध्ये मुंबई येथून ते बीए झाले. त्याच वर्षी लोकमान्य टिळकांनी फर्ग्युसन कॉलेजमधील आपल्या जागेचा राजीनामा दिल्यावर नामदार गोखल्यांनी त्यांची गणिताचे प्राध्यापक म्हणून नेमणूक केली. त्यानंतर त्यांच्या समाजकार्यास चालना मिळाली. पहिली पत्नी वारल्यानंतर (१८९१) त्यांनी पंडिता रमाबाईच्या 'शारदा सदन' या संस्थेतील एका विधवेशी पुनर्विवाह केला. या पुनर्विवाहामुळे कर्व्यांना तत्कालीन ब्राह्मण समाजाने वाळीत टाकले, पण तरीही न डगमगता त्यांनी विधवांच्या उद्धाराचे कार्य चालूच ठेवले.

पुण्याजवळील हिंगणे येथे १९०० सालापासून हा आश्रम सुरू झाला. पुढे सुगृहिणीपदाच्या दृष्टीने योग्य असेच शिक्षण स्त्रियांना दिले पाहिजे, या जाणिवेने ते स्वतंत्र महिला विश्वविद्यालयाच्या स्थापनेसाठी प्रयत्न करू लागले. त्यातूनच ठाकरसी कुटुंबाच्या आर्थिक मदतीने १९१६ मध्ये श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ उभे राहिले. या विद्यापीठातील अभ्यासक्रमामध्ये स्त्रीजीवनाशी संबद्ध अशा विविध विषयांचा समावेश असून शिक्षणाचे माध्यम मातृभाषा आहे. अनाथ बालिकाश्रम आणि महिला विद्यापीठ या संस्थांतून महाराष्ट्रातील हजारो स्त्रियांनी आपले शिक्षण पुरे केले आहे. या दोन संस्थांच्या उभारणीसाठी आणि आर्थिक स्थैर्यासाठी कर्व्यांनी आयुष्यभर स्वदेशात आणि परदेशातही (१९२९-३२) मिशनरी बाण्याने वणवण केली. त्यांचा भारत सरकारने पद्मविभूषण (१९५५), भारतरत्न (१९५८) या पदव्या देऊन गौरव केला. अशा या थोर समाजसुधारकाचे ९ नोव्हेंबर १९६२ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Apr 18, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

Jagdamba Education Society's

SND POLYTECHNIC

KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTNING

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401